|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०५/संलग्नता/पप्र-२०२३-२४/१७५/२०२३ दि. ०१/०६/२०२३

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

मा. प्राचार्य,

कबचौउमविशी संलग्नित सर्व कला, वाणिज्य व विज्ञान व समाजकार्य महाविद्यालये, (पदव्युत्तर)

**विषय :- शैक्षणिक वर्ष 2023-2024 करीता पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थी प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या निकषा बाबत..**

महोदय,

वरील विषयान्वये कळविण्यात येते की, पदव्युत्तर वर्गाचे दर्जेदार अध्यापन व्हावे, करीता पात्र व अहर्ताधारक अध्यापक असावे व पदव्युत्तर वर्गाचे नियोजन करून उचित कार्यवाही व्हावी. या हेतूने विद्यापीठ मान्यता प्राप्त कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेंतर्गत एम.ए./एम.कॉम./ एम.एस्सी./एम.एस.डब्ल्यू. या पदव्युत्तर वर्गातील शैक्षणिक वर्ष 2023-2024 पासून अध्यापनासह पदव्युत्तर वर्गाच्या दर्जेदार शिक्षणासाठी महाविद्यालयाकरीता खालील निकष तयार करण्यात आलेले असून, त्यानुसार महाविद्यालयाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

1. पदव्युत्तर वर्ग भाग-1 व भाग-2 साठी विद्यापीठाने निश्चित केलेल्या नियमासह विद्यार्थी क्षमतेनुसार खालील अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून, शै.व. 2023-2024 करीता गुणवत्ता यादी जाहिर करुनच प्रवेश प्रक्रिया राबवावी.
2. विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय पदव्यूत्तर वर्ग भाग-1 व भाग-2 साठी प्रवेश देवू नये. पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी विद्यार्थी संख्या निश्चित करून देण्यासाठी विद्यापीठाचे दि. 30/05/2014 व दि. 28/06/2014 व दि.01/06/2023 रोजीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे परिशिष्ठ अ,ब,क व ड मध्ये माहिती 15 जून 2023 पर्यंत विद्यापीठास सादर करावी.
3. शैक्षणिक वर्ष 2023-2024 करीता M.Sc. भाग-1 विज्ञान विद्याशाखेची प्रवेश प्रक्रिया केंद्रिय पध्दतीने असेल.
4. पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विषयासाठी महाविद्यालयाने समन्वयकाची नेमणूक करावी.
5. पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विषयासाठी महाविद्यालयाने विद्यापीठ परिनियम 415(1) अन्वये मान्यता असलेल्या किमान 02 अहर्ताधारक पात्र शिक्षकाची नेमणूक करावी, व त्यास विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागाची मान्यता घ्यावी.
6. पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विषयासाठी भाग-1 व भाग-2 यासाठी महाविद्यालयाने पदव्युत्तर शिक्षक मान्यता असलेल्या अनुभवी व पी.एच.डी. धारक जास्तीत जास्त दोन शिक्षकांची तीन पेपर्स करीता अध्यापनासाठी नियुक्ती करता येईल.
7. पदव्युत्तर वर्गाच्या भाग-1 व भाग-2 अध्यापनासाठी महाविद्यालयास जास्तीत जास्त दोन पदव्युत्तर मान्यता प्राप्त शिक्षकांची महाविद्यालया बाहेरील Visiting Faculty म्हणून दोन पेपर्स साठी नियुक्ती करता येईल.
8. पदव्युत्तर वर्गासाठीचे नियमित शिक्षक, पदव्युत्तर मान्यता शिक्षक, Visiting Faculty यांची नियुक्ती पत्रे व त्यांचे संमती पत्रे समन्वयकाने दप्तरी ठेवावे. तसेच त्यांचे वेतन व मानधन दरमाह नियमितपणे बँकेव्दारा अदा करावा.
9. विद्यापीठाचे निर्देशाप्रमाणे पदव्युत्तर वर्गाच्या प्रश्नपत्रिकेसह उत्तरपत्रिका काढणे व परीक्षा विषयक कामकाज संबंधित महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागात कार्य करणा-या शिक्षकांवर बंधनकारक राहील.
10. विद्यापीठ परिनियम 415(1) नुसार पदव्युत्तर वर्गासाठी एकही शिक्षक नियुक्त केलेला नसल्यास पदव्युत्तर वर्गाच्या भाग-1 व भाग-2 साठी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नये. चुकून विद्यार्थी प्रवेशित केल्यास त्यास मान्यता दिली जाणार नाही.
11. पदव्युत्तर वर्गासाठी अंदाजे कार्यभार व अध्यापन कार्य खालीलप्रमाणे राहिल.

| अध्यापनाचा प्रकार | कार्यभार | भाग-1 व भाग-2 कार्यभार |
|---|---|---|
| 1) 415 (1) नुसार शिक्षक कार्यभार | 5 पेपर्स | 5 पेपर्स |
| 2) पदव्युत्तर मान्यता शिक्षण कार्यभार | 3 पेपर्स | 3 पेपर्स |
| 1) Visiting Faculty | 2 पेपर्स | 2 पेपर्स |

वरील नियमाच्या अधिन राहूनच शैक्षणिक वर्ष 2023-2024 वर्षासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही करावी. मात्र मुद्दा क्र.02 बाबतची माहिती तात्काळ विहीत कालावधीत पाठवावी, ही विनंती.

आपला विश्वासु,

(ग.नो.पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

प्रत माहितीसाठी :-

01) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
02) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
03) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
04) मा.प्र.संचालक, परीक्षा मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव
05) सहा.कुलसचिव, प्रवेश व पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, उमवि, जळगाव